परिचर्या प्रशिक्षण संस्था, मुंबई येथील ३१ अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०१८ ते ३०.०९.२०१८ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय
शासन निर्णय क्रमांक : अपदे-२०१८/प्र.क्र.१२/परिचर्या
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार (७ वा मजला),
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१.
दिनांक : १७ मार्च २०१८.

वाचा :-
१. शासन निर्णय क्रमांक : एनयुआर २०१७/प्र.क्र.१८/२०१७/परिचर्या, दि.२४.०१.२०१८
२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्रमांक संवैशिवसं/अ.पदे मु.वाढ/३-४-५-७ अ/१८६५, दिनांक २०.०२.२०१८.
३. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र. ८/१६/आ.पु.क., दि. ०८.०१.२०१८.
४. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि. ०५.०३.२०१८.

प्रस्तावना :-

संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये परिचर्या प्रशिक्षण संस्था, मुंबई येथील ३१ अस्थायी पदांना दिनांक ०१.०१.२०१८ ते दिनांक २८.०२.२०१८ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदरची मुदतवाढ दिनांक २८.०२.२०१८ रोजी संपुष्टात आली आहे.

२. शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, दिनांक २१.०४.२०१४ अन्वये परिचर्या शिक्षण संस्थेमध्ये बेसिक बीए.एस्सी.(न.) व एम.एस्सी.(न.) या अभ्यासक्रमात प्रवेश दिलेल्या विद्यार्थांना शिकविण्यासाठी भारतीय परिचर्या परिषदेच्या मानकांनुसार व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची नुतनीकरण/विस्तारीकरण/मान्यता प्राप्त होण्यासाठी आवश्यक असणारी परिचर्या संवर्गातील ८ पदे नव्याने निर्माण झालेली आहेत. या ८ पदांचा अंर्तभाव प्राचार्य, परिचर्या शिक्षण संस्था मुंबई येथील २३ अस्थायी पदांच्या मुदतवाढीच्या प्रस्तावात समावेश असून २३+८ अशा एकूण ३१ अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०१८ पासून पुढे चालू ठेवण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या वरील संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये सादर करण्यात आलेला आहे.

३. वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या आस्थापनेवरील सर्व संस्थातील पदांच्या आढाव्याचा प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीने मान्य केला असून त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ०२.०४.२००४ रोजी निर्गमित करण्यात आला होता. वित्त विभाग, शासन निर्णय,

दि.०५.०३.२०१८ मधील तरतुदीनुसार प्रशासकीय विभागांना त्यांच्या व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील मंजूर पदाचा आढावा घेऊन सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्याबाबत दक्षता घ्यावी असे निर्देशित केले आहे. शासन निर्णय, वित्त विभाग, दि.०४.१०.२००४ नुसार सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या प्रशासकीय विभाग व कार्यालयांच्या सुधारित आकृतीबंधाच्या शासन निर्णयात दर्शविण्यात आलेल्या पदांपैकी सर्व अस्थायी पदांना आवश्यकतेनुसार पुढील मुदतवाढ देण्याचा अधिकार सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

<u>शासन निर्णय:-</u>

१. परिचर्या प्रशिक्षण संस्था, मुंबई या संस्थेच्या कामकाजाच्या तसेच रुग्णालयातील रुग्णाच्या रुग्ण सेवेच्या हितार्थ सदरहू अस्थायी पदे चालू ठेवणे अत्यंत अनिवार्य असल्याने वित्त विभाग, शासन निर्णय, दि.०५.०३.२०१८ अन्वये प्रशासकीय प्रमुखास प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई या कार्यालयातील आस्थापनावरील सोबतच्या विवरणपत्रात दर्शविलेली एकूण ३१ अस्थायी पदे दि. ०१.०३.२०१८ ते दि.३०.०९.२०१८ या कालावधीसाठी म्हणजेच ७ महिन्यांच्या कालावधीसाठी पुढे सुरु ठेवण्यास या शासन निर्णयान्वये शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर कालावधीमध्ये कोणत्याही परिस्थितीत प्रशासकीय विभागाने शासनाच्या कार्यपध्दतीत तंत्रज्ञानाचा वाढता वापर, कालानुरुप शासनाच्या मनुष्यबळात बदल व मनुष्यबळाच्या परिणामकारक वापराची आवश्यकता याबाबी विचारात घेऊन उक्त नमूद शासन निर्णय, दि. ०५.०३.२०१८ मधील तरतुदीनुसार आढाव्यास (नव्याने निर्माण केलेल्या पदासह) उच्च स्तरीय सचिव समितीची मान्यता घेऊन सुधारित आकृतीबंध निश्चित करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास मुदतवाढी अभावी सदर अस्थायी पदाच्या वेतनाचा प्रश्न उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागावर निश्चित करण्यात आली असल्यामुळे संचालक (वै.शि.) यांना असे सूचित करण्यात येते की, उक्त अस्थायी पदांपैकी काही पदे स्थायी करणे, अस्थायी ठेवणे तसेच याशिवाय नव्याने निर्माण केलेली पदे स्थायी करणे, अस्थायी करणे याबाबतचा आकृतीबंध आढावा घेण्यात येऊन त्या आकृतीबंधास उच्च स्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्यासाठी माहे मार्च-२०१८ अखेरपर्यंत कोणत्याही परिस्थिती यथायोग्य प्रस्ताव शासनास तात्काळ सादर करावा, की ज्यामुळे सदर पदावर कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना मुदतवाढीच्या अभावी वेतनाचा प्रश्न उद्भवणार नाही. असे झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विभाग प्रमुख म्हणून संचालनालयावर राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

३. परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई येथील :-

अ) ३१ अस्थायी पदे रुग्णसेवा, अत्यावश्यक सेवा व शैक्षणिक अभ्यासक्रम राबविण्यासाठी अत्यावश्यक आहे.

ब) सर्व पदांच्या वेतनश्रेणी सहाव्या आयोगाने सुचविलेल्या नवीन वेतन श्रेणी अनुसार आहेत.

क) ३१ अस्थायी पदांपैकी २३ अस्थायी पदांची सांख्यिकी प्रमुख यांच्याकडून योग्य पडताळणी करण्यात आलेली आहे, व उर्वरित ८ नव्याने निर्माण करण्यात आलेल्या पदांची पडताळणी करण्याची कार्यवाही सुरू आहे.

४. सदर अस्थायी पदांवर होणारा खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात येईल. (सन २०१७-२०१८) या आर्थिक वर्षातील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

<u>लेखाशिर्ष :-</u>

योजनेत्तर - मागणी क्रमांक एस - १

२२१०	-	वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०५	-	वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन
१०५	-	विषम चिकित्सा
१०५- (०३)	-	परिचर्या शिक्षण व संस्था, मुंबई
(०३) (०५)	-	परिचर्या शिक्षण व संस्था, मुंबई
सांकेतिक क्र.	-	(२२१० २३७२)

५. हे आदेश, शासन निर्णय, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.०५.०३.२०१८ नुसार, मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१७१२३४१९०२१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHAJAN HEMANT ANANT

Digitally signed by MAHAJAN HEMANT ANANT
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drug Department, postalCode=400001, st=Maharashtra, 2.5.4.20=18b72890e049ba3219e993bae40e4fae87fba16fd8c92cbf7f96107d9c100ae1, serialNumber=4146b85aaa58555e80c9d75a2aba23b993e46df208b0b469f1b74670dc22d7fa, cn=MAHAJAN HEMANT ANANT
Date: 2018.03.20 17:17:59 +05'30'

(हेमंत महाजन)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा.राज्यपाल,महाराष्ट्र शासन यांचे सचिव

मा. अध्यक्ष, विधान सभा, विधानमंडळ, मुंबई

मा. सभापती, विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई

मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई

मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मुख्य सचिव यांचे सचिव
महालेखापाल-१ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य-१, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई (३ प्रती)
प्राचार्या, परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई (३ प्रती)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
वित्त विभाग (व्यय-१३), (वित्तीय सुधारणा-१), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
कक्ष अधिकारी (वैसेवा-१), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती (परिचर्या).

विवरण पत्र "अ"
संस्थेचे नांव :- परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई
विद्यार्थी प्रवेश क्षमता / मंजूर रुग्ण खाटा

१. विद्यार्थी प्रवेश क्षमता :- पी.बी.बी.एस्सी. (नर्सिंग)३० प्रतिवर्ष
२. बालरोग अधिपरिचारिका प्रशिक्षण :- २० प्रतिवर्ष
३. एम.एस्सी. नर्सिंग :- २५ प्रतिवर्ष
४. मंजूर खाटांची संख्या :- निरंक

अ.क्र.	पदनाम	पद संख्या (अंकी)	पद संख्या (अक्षरी)	वेतनश्रेणी	पद मंजूरीचा शासन निर्णय क्रमांक व दिनांक	संस्थेचे लेखाशिर्ष योजनेत्तर मागणी क्रमांक एस-१	मागील वर्षाची अस्थाई पदे पुढे चालू ठेवण्यास मान्यता दिलेल्या शासन आदेशाच्या क्रमांक व दिनांक	अस्थाई पदे पुढे चालू ठेवण्याबाबत चे समर्थन
१	२	३	४	५	६	७	८	९
					वर्ग-१			
१.	प्राध्यापक -नि- उपप्राचार्या	१	एक	रु. १५६००-३९१०० + ग्रेड पे रु. ५४००/-	क्र. एनयुआर २००९/प्र.क्र.१९४/परिचर्या दिनांक २१.०४.२०१४	योजनेत्तर मागणी क्रमांक एस-१ २२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०५-वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण संशोधन १०५-विषमचिकित्सा १०५ (०३)- वैद्यकीय महाविद्यालय (०३) (०५) परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई	---	भारतीय शुश्रृषा परिषद व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांच्या मानकानुसार
					वर्ग-२			
२.	प्राध्यापक	१	एक	रु. ९३००-३४८०० + ग्रेड पे रु. ४६००/-	युडीपीएचडी क्र.एनयुआर-१०६५/१४९०/३१/०५/१९६६	योजनेत्तर मागणी क्रमांक एस-१ २२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०५-वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण संशोधन १०५-विषमचिकित्सा १०५ (०३)- वैद्यकीय महाविद्यालय (०३) (०५) परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई	क्र.एनयुआर २०१७/ प्र.क्र.१८/२०१७ /परिचर्या दि.१३.११.२०१७	भारतीय शुश्रृषा परिषद व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांच्या मानकानुसार

३.	सहयोगी प्राध्यापक	२	दोन	रु. ९३००-३४८०० + ग्रेड पे रु. ४६००/-	क्र. एनयुआर-२००९/प्र.क्र.१९४/परिचर्या, दि. २१/०४/२०१४	वरील प्रमाणे	वरील प्रमाणे	वरील प्रमाणे
४.	अधिव्याख्याता	१	एक	रु. ९३००-३४८०० + ग्रेड पे रु. ४६००/-	युडीपीएचडी व एचडी. शासन निर्णय क्र. एलएन-१०७२/६८३९/जी-२, दि.२५/०२/१९७३	वरील प्रमाणे	वरील प्रमाणे	वरील प्रमाणे
		५	पाच	रु. ९३००-३४८०० + ग्रेड पे रु. ४६००/-	क्र. एनयुआर-२००९/प्र.क्र.१९४/परिचर्या, दि. २१/०४/२०१४	वरील प्रमाणे	वरील प्रमाणे	वरील प्रमाणे
वर्ग-३								
५.	चिकीत्सालयीन निर्देशक	१	एक	रु. ९३००-३४८०० + ग्रेड पे रु. ४४००/-	युडीपीएचडी व एचडी. शासन निर्णय क्र.एनयुआर-१०७५/१९७५/१७८८/पीएच डी, दि.२५.०५.१९७३	योजनेत्तर मागणी क्रमांक एस-१ २२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०५-वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण संशोधन १०५-विषमचिकित्सा १०५ (०३)- वैद्यकीय महाविद्यालय (०३) (०५) परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई	क्र.एनयुआर२०१७/प्र.क्र.१८/२०१७ /परिचर्या दि.१३.११.२०१७	भारतीय शुश्रृषा परिषद व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांच्या मानकानुसार
६.	वरिष्ठ लिपिक	१	एक	रु. ५२००-२०२०० + ग्रेड पे रु. २४००/-	युडीपीएचडी व एचडी. शासन निर्णय क्र.सीएलएम-१०७२/६८९३/जी-२, दि.२५.०५.१९७३	वरील प्रमाणे	वरील प्रमाणे	वरील प्रमाणे
७.	बालरोग अधिपरिचारीका	१४	चौदा	रु. ५२००-२०२०० + ग्रेड पे रु. ४३००/-	युडीपीएचडी व एचडी. शासन निर्णय, क्र. एनयुआर ३८७७/जी-डी/ दि.२९/७/१९५८	वरील प्रमाणे	वरील प्रमाणे	वरील प्रमाणे

वर्ग-४

८.	चपराशी	१	एक	रु. ४४००-७४४० + ग्रेड पे रु. १३००/-	युडीपीएचडी व एचडी. शासन निर्णय, क्र. एनयुआर ११७२/ ६७७८०/जी-२, दि.०६/०७/१९७३	योजनेत्तर मागणी क्रमांक एस-१ २२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०५-वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण संशोधन १०५-विषमचिकित्सा १०५ (०३)- वैद्यकीय महाविद्यालय (०३) (०५) परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई	क्र.एनयुआर२०१७ / प्र.क्र.१८/२०१७ /परिचर्या दि.१३.११.२०१७	भारतीय शुश्रृषा परिषद व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांच्या मानकानुसार
९.	चतुर्थ श्रेणी कर्मचारी	१	एक	रु. ४४००-७४४० + ग्रेड पे रु. १३००/-	युडीपीएचडी व एचडी. शासन निर्णय, क्र. एनयुआर १०७१/ ३१७६६/जी-२, दि.२१/०४/१९७३	वरील प्रमाणे	वरील प्रमाणे	वरील प्रमाणे
१०.	चतुर्थ श्रेणी कर्मचारी	१	एक	रु. ४४००-७४४० + ग्रेड पे रु. १३००/-	युडीपीएचडी व एचडी. शासन निर्णय, क्र. एनयुआर १०६३/८४५२/जी-२, दि.१०/०४/१९७५	वरील प्रमाणे	वरील प्रमाणे	वरील प्रमाणे
११.	पहारेकरी	१	एक	रु. ४४००-७४४० + ग्रेड पे रु. १३००/-	युडीपीएचडी व एचडी. शासन निर्णय, क्र. एनयुआर १०६३/८४५२/जी-२, दि.१०/०४/१९७५	वरील प्रमाणे	वरील प्रमाणे	वरील प्रमाणे
१२.	सफाईगार	१	एक	रु. ४४००-७४४० + ग्रेड पे रु. १३००/-	युडीपीएचडी व एचडी. शासन निर्णय, क्र. एनयुआर १०७१/ ३१७६६/जी-२, दि.२१/०४/१९७३	वरील प्रमाणे	वरील प्रमाणे	वरील प्रमाणे

पूर्वीची २३ पदे	नवीन ८ पदे	एकूण ३१ पदे
वर्ग १ - निरंक	वर्ग १ - ०१	वर्ग १ - ०१
वर्ग २ - ०२	वर्ग २ - ०७	वर्ग १ - ०९
वर्ग ३ - १६	वर्ग ३ - निरंक	वर्ग १ - १६
वर्ग ४ - ०५	वर्ग ४ - निरंक	वर्ग १ - ०५

MAHAJAN HEMANT ANANT

Digitally signed by MAHAJAN HEMANT ANANT
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drug Department, postalCode=400001, st=Maharashtra, 2.5.4.20=18b72890e049ba3219e993bae40e4fae87fba16fd8c92cbf7f96107d9c100ae1, serialNumber=4146b85aaa58555e80c9d75a2aba23b993e46df208b0b469f1b74670dc22d7fa, cn=MAHAJAN HEMANT ANANT
Date: 2018.03.20 17:18:58 +05'30'

(हेमंत महाजन)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

विवरण पत्र "ब"

संस्थेचे नाव :- परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई

अ.क्र.	पदनाम	वर्ग	स्थायी	अस्थायी	एकूण
१	२	३	४	५	६
१.	प्राचार्या	वर्ग-१	०१	-	०१
२.	प्राध्यापक-नि-उपप्राचार्य	वर्ग-१	००	०१	०१
३.	प्राध्यापक	वर्ग-२	०२	०१	०३
४.	*सहयोगी प्राध्यापक	वर्ग-२	००	०२	०२
५.	प्रशासकीय अधिकारी	वर्ग-२	०१	-	०१
६.	*अधिव्याख्याता	वर्ग-२	०३	०१+०५	०९
७.	चिकित्सालयीन निर्देशिक	वर्ग-३	०६	०१	०७
८.	बालरोग परिचारिका/ विद्यार्थी	वर्ग-३	-	१४	१४
९.	ग्रंथपाल	वर्ग-३	०१	-	०१
१०.	सहाय्यक ग्रंथपाल	वर्ग-३	०१	-	०१
११.	वसतीगृह अधिक्षिका	वर्ग-३	०१	-	०१
१२.	प्रयोगशाळा सहाय्यक	वर्ग-३	०१	-	०१
१३.	वाहन चालक	वर्ग-३	०१	-	०१
१४.	प्रमुख लिपिक/ रोखपाल	वर्ग-३	०१	-	०१
१५.	वरिष्ठ लिपिक	वर्ग-३	०१	०१	०२
१६.	कनिष्ठ लिपिक	वर्ग-३	०१	-	०१
१७.	शिपाई (चपराशी)	वर्ग-४	०२	०१	०३
१८.	चतुर्थश्रेणी कर्मचारी	वर्ग-४	०७	०२	०९
१९.	पहारेकरी	वर्ग-४	०३	०१	०४
२०.	सफाईगार	वर्ग-४	०३	०१	०४
२१.	ग्रंथालय सेवक	वर्ग-४	०१	-	०१
	एकूण		**३७**	**३१**	**६८**

MAHAJAN HEMANT ANANT

Digitally signed by MAHAJAN HEMANT ANANT
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drug Department, postalCode=400001, st=Maharashtra, 2.5.4.20=18b72890e049ba3219e993bae40e4fae87fba16fd8c92cbf7f96107d9c100ae1, serialNumber=4146b85aaa58555e80c9d75a2aba23b993e46df208b0b469f1b74670dc22d7fa, cn=MAHAJAN HEMANT ANANT
Date: 2018.03.20 17:20:24 +05'30'

(हेमंत महाजन)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

विवरण पत्र “क”

संस्थेचे नाव :- परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई

एकूण मागील वर्षाची पदे		मागील एकूण पदानंतर मंजुर पदे		किती पदे कमी झाली किंवा व्यपगत झाली त्याबाबतची माहिती तसेच कमी झालेली / व्यपगत झालेली पदे व त्या पदांच्या निर्मितीच्या शासन निर्णयाचा क्रमांक व दिनांक			आता किती पदे चालु ठेवण्याचा प्रस्ताव दिलेला आहे.		
१		२		३			४		
स्थायी	अस्थायी	स्थायी	अस्थायी	स्थायी	अस्थायी	एकूण	स्थायी	अस्थायी	एकूण
३७	३१	निरंक	निरंक	निरंक	१		३७	३१	६८
				१५ अधिपरिचारिकांपैकी १ पद व्यपगत झाले. पद निर्मितीचा शासन निर्णय क्र. एनयुआर-३८७७४/ जी.डी, दि. १९/७/१९९८					

MAHAJAN HEMANT ANANT

Digitally signed by MAHAJAN HEMANT ANANT
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drug Department, postalCode=400001, st=Maharashtra, 2.5.4.20=18b72890e049ba3219e993bae40e4fae87fba16fd8c92cbf7f96107d9c100ae1, serialNumber=4146b85aaa58555e80c9d75a2aba23b993e46df208b0b469f1b74670dc22d7fa, cn=MAHAJAN HEMANT ANANT
Date: 2018.03.20 17:21:41 +05'30'

(हेमंत महाजन)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

संस्थेचे नांव :- परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई

१. विद्यार्थी प्रवेश क्षमता	:-	पी.बी.बी.एस्सी. (नर्सिंग)३० प्रतिवर्ष
२. बालरोग अधिपरिचारिका प्रशिक्षण	:-	२० प्रतिवर्ष
३. बेसिक एम.एस्सी. नर्सिंग	:-	२५ प्रतिवर्ष
४. मंजूर खाटांची संख्या	:-	निरंक

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यत येते की, परिचर्या शिक्षण संस्था, मुंबई या संस्थेत ३७ स्थायी पदे व ३१ अस्थायी पदे अशी एकूण ६८ पदे मंजूर असून उपरोक्त पदे ही भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार भारतीय परिचर्या परिषद व दैनंदिन गरजेनुसार शैक्षणिक व रुग्णसेवेच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत.

मंजूर असणाऱ्या सर्व पदांच्या वेतनश्रेणी सहाव्या वेतन आयोगाने सुचविलेल्या प्रमाणे असून सर्व अस्थायी पदांची पडताळणी संस्था स्तरावर करण्यात आलेली असून उपरोक्त नमूद स्थायी अस्थायी पदांची संख्या बरोबर आहे. संस्थेतील ३१ अस्थायी पदांपैकी २३ पदे सहा महिन्यांपेक्षा अधिक करिता रिक्त नाहीत. नव्याने निर्माण करण्यात आलेली ८ अस्थायी पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर संस्थेतील सर्व अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०१८ ते दिनांक ३०.०९.२०१८ पर्यंत पुढे चालू ठेवण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

MAHAJAN HEMANT ANANT

Digitally signed by MAHAJAN HEMANT ANANT
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drug Department, postalCode=400001, st=Maharashtra, 2.5.4.20=18b72890e049ba3219e993bae40e4fae87fba16fd8c92cbf7f96107d9c100ae1, serialNumber=4146b85aaa58555e80c9d75a2aba23b993e46df208b0b469f1b74670dc22d7fa, cn=MAHAJAN HEMANT ANANT
Date: 2018.03.20 17:25:13 +05'30'

(हेमंत महाजन)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन